सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधी व न्याय विभाग**

## सन १९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १

# महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम

**(दिनांक २५ एप्रिल २०१३ पर्यंत सुधारित)**

## Bombay Act No. I of 1904

# Maharashtra General Clauses Act

*(As Modified upto 25th April, 2013)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि
संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
प्रकाशित केले.

**२०१५**

[ **किंमत** : रु. ३४.०० ]

# महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम

## अनुक्रमणिका


| कलमे. | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव | १ |
| १-अ. | दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजी किंवा त्यानंतर केलेले अधिनियम, नियम इत्यादींस अधिनियम लागू करणे. | १ |
| १-ब. | महाराष्ट्र राज्याचे अधिनियम, नियम इत्यादींना हा अधिनियम लागू करणे. | २ |
| २. | निरसन. | २ |
| | **सर्वसाधारण व्याख्या** | |
| ३. | व्याख्या. | २ |
| ४. | मागील व्याख्यांपैकी विवक्षित व्याख्या पूर्वीच्या मुंबई अधिनियमांना लागू करणे. | ८ |
| | **अन्वयार्थाबाबत सर्वसाधारण नियम** | |
| ५. | मुंबई अधिनियम किंवा महाराष्ट्र अधिनियम अंमलात येणे. | ९ |
| ६. | प्रकरणानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, राज्यपाल, राष्ट्रपती किंवा हिज मॅजेस्टी यांची अनुमती मिळाल्यानंतर अधिनियम ज्या दिनांकास प्रसिद्ध करण्यात येईल तो दिनांक छापणे. | ९ |
| ७. | निरसनाचा परिणाम. | ९ |
| ७-अ. | कोणत्याही अधिनियमाच्या मूळ मजकुरात सुधारणा करणाऱ्या अधिनियमितींचे निरसन. | १० |
| ८. | निरसित केलेल्या अधिनियमितींचे पुनरुज्जीवन. | १० |
| ९. | निरसित अधिनियमितींच्या निर्देशांचा अन्वयार्थ. | १० |
| १०. | मुदतीचा प्रारंभ व शेवट. | ११ |
| ११. | मुदतीची संगणना. | ११ |
| १२. | अंतराची मोजणी. | ११ |
| १३. | लिंग आणि वचन. | ११ |
| | **अधिकार आणि कार्याधिकारी** | |
| १४. | कोणत्याही शासनास दिलेल्या अधिकारांचा वेळोवेळी वापर करणे. | ११ |
| १५. | नेमणूक करण्याच्या अधिकारामध्ये पदसिद्ध नेमणूक करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे. | १२ |
| १६. | नेमणूक करण्याच्या अधिकारामध्ये निलंबित करण्याच्या किंवा बडतर्फ करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे. | १२ |
| १७. | कार्याधिकाऱ्याऐवजी दुसरा कार्याधिकारी नेमणे. | १२ |
| १८. | उत्तराधिकारी. | १२ |

## **अनुक्रमणिका—**समाप्त


**कलमे** **पृष्ठे**

१९. कार्यालयीन मुख्याधिकारी आणि दुय्यम कर्मचारी. १२

**अधिनियमितींअन्वये केलेले आदेश, नियम इत्यादी संबंधीच्या तरतुदी**

२०. मुंबई अधिनियमान्वये किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये काढलेले आदेश, वगैरे यांचे अन्वयार्थ. १२

२१. आदेश, इत्यादी काढण्याच्या अधिकारामध्ये जादा मजकूर दाखल करण्याच्या, सुधारणा करण्याच्या फेरफार करण्याच्या किंवा विखंडित करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे. १३

२२. मुंबई अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र अधिनियमाच्या प्रसिद्धिच्या आणि प्रारंभाच्या दरम्यान नियम किंवा उपविधी करणे किंवा आदेश देणे. १३

२३. आदेश अणि अधिसूचनेची **राजपत्रातील** प्रसिद्धी ही, त्यांची यथोचित प्रसिद्धी असल्याचे समजणे. १३

२४. पूर्वप्रसिद्धी देऊन नियम किंवा उपविधी, करण्याच्या बाबतीत लागू असलेल्या तरतुदी. १३

२५. निरसित करून पुन्हा अधिनियमित केलेल्या अधिनियमित केलेल्या अधिनियमितींअन्वये दिलेले आदेश इत्यादी चालू राहणे. १४

**संकीर्ण**

२६. दंड वसुली. १४

२७. दोन किंवा अधिक अधिनियमितींखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधाबाबतच्या तरतूदी. १५

२८. डाकेने बजावणी याचा अर्थ. १५

२९. अधिनियमितीचा उल्लेख करणे. १५

३०. पूर्वीचे अधिनियम, नियम आणि उपविधी यांची व्यावृत्ती. १५

३१. अध्यादेश आणि विनियम यांना हा अधिनियम लागू असणे. १६

**अनुसूची** १७

**शब्दसूची** २६

# सन १९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १[१]

## महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम

**[३० मे, १९०४]**

या अधिनियमात पुढील अधिनियम व आदेश यांद्वारे सुधारणा, अनुकूलन व रूपभेद करण्यात आले :—
सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.
भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.
सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७.†
सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५.
विधी अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८.
मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय). आदेश, १९५६.
सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४.
सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय). आदेश, १९६०.
सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ @ (२२-०८-२०१२)

### मुंबई अधिनियमांमध्ये वापरलेली भाषा अधिक संक्षिप्त करण्यासाठी आणि इतर प्रयोजनांसाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** मुंबई अधिनियमांमध्ये वापरलेली भाषा अधिक संक्षिप्त करणे आणि त्या अधिनियमाशी संबंधित अशा विवक्षित इतर तरतुदी करणे इष्ट आहे ;

**ज्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

### प्रारंभिक

**१.** या अधिनियमास, [२][महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम] असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

[३][**१अ.** मुंबई अधिनियम, विनियम व अध्यादेश यांच्याशी संबंधित असलेल्या या अधिनियमाच्या तरतुदी या, दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी किंवा त्यानंतर पारित केलेल्या* मुंबई राज्याच्या अधिनियमांच्या विनियमांच्या व अध्यादेशांच्या संबंधात देखील लागू होतील आणि या अधिनियमाच्या ज्या तरतुदी कोणत्याही अधिसूचनेस, आदेशास, योजनेस, नियमास, उपविधीस किंवा नमुन्यात लागू असतील त्या दिनांकास किंवा दिनांकानंतर पारित केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये केलेल्या विनियमान्वये किंवा प्रख्यापित केलेल्या अध्यादेशान्वये काढलेल्या, दिलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही अधिसूचनेच्या आदेशाच्या, योजनेच्या, नियमाच्या उपविधीच्या किंवा नमुन्याच्या संबंधात देखील लागू होतील : दिनांक १ नोव्हेंबर १९५६ रोजी किंवा त्यानंतर केलेले अधिनियम, नियम, इत्यादींस अधिनियम लागू करणे.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **मुंबई शासन राजपत्र**, (इंग्रजी) १९०३ भाग सात पृष्ठे ५, ६ पहा; निवड समितीच्या अहवालासाठी **मुंबई शासन राजपत्र**, १९०४, भाग सात, पृष्ठ १ पहा आणि परिषदेतील कामकाजविषयक वृत्तासाठी **मुंबई शासन राजपत्र,** (इंग्रजी) १९०३ भाग सात पृष्ठे १३० पहा व १९०४, भाग सात पृष्ठे १३० व १९०४, भाग सात पृष्ठ ४२ पहा.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २४, कलम २ अनुसूची नोंद ११ अन्वये अधिनियमाचे नावात " महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम " अशी सुधारणा करण्यात आली व ती दिनांक १ मे १९६० पासून भरण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

[३] सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४, कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

† हा अधिनियम पुन्हा अधिनियमित करण्यात आला आणि उक्त अधिनियमाच्या कलम ९ व अनुसूची ' इ ' द्वारे करण्यात आलेल्या सुधारणा सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ द्वारे अंमलात ठेवल्या आहेत.

@ अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

* " मुंबई राज्य " या मजकुरात फेरबदल होणार नाहीत महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समावर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

परंतु दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ रोजी किंवा त्यानंतर पारित केलेला, करण्यात आलेला, किंवा प्रख्यापित केलेला असा कोणताही अधिनियम, विनिमय, अध्यादेश, अधिसूचना आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना याद्वारे राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याचे कलम ८ पोट-कलम (१), खंड (ब) ते (ई) याअन्वये नवीन मुंबई राज्याकडे हस्तांतरित केलेल्या प्रदेशांच्या संबंधात त्या दिनांकापुर्वी पारित केलेला, किंवा प्रख्यापित केलेला कोणताही अधिनियम, विनियम, अध्यादेश अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना यांची सुधारणा करण्यात आली असेल त्याबाबतीत, अशा प्रकारे सुधारलेल्या कायद्याचा अर्थ लावण्याच्या संबंधात या अधिनियमातील यापुढील तरतुदी लागू न होता त्या प्रदेशात अमलात असलेला कायदा, सुधारणा करणाऱ्या कायद्याला लागू होतील.] १९५६ चा ३७.

महाराष्ट्र राज्याचे अधिनियम, नियम, इत्यादींना हा अधिनियम लागू करणे.

[1][**१-ब.** या अधिनियमाच्या तरतुदी, मुंबई अधिनियम, विनियम, अध्यादेश यांच्याशी संबंधित असलेल्या या अधिनियमाच्या तरतुदी, १ मे, १९६० रोजी किंवा त्यानंतर पारित केलेले, करण्यात आलेले, किंवा प्रख्यापित केलेले महाराष्ट्र राज्याचे अधिनियम विनियम व अध्यादेश यांच्या संबंधातही लागू असतील आणि कोणतीही अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना यांच्याशी संबंधित असलेल्या या अधिनियमाच्या तरतुदी, त्या दिनांकास किंवा त्यानंतर पारित केलेला, करण्यात आलेला किंवा प्रख्यापित केलेला कोणताही अधिनियम, विनियम किंवा आदेश, काढलेली कोणतीही अधिसूचना, आदेश, योजना, केलेला नियम, उपविधी किंवा नमुना यांनाही लागू असतील.

परंतु त्या दिनांकास किंवा त्यानंतर पारित केलेला, करण्यात आलेला किंवा प्रख्यापित केलेला असा कोणताही अधिनियम, विनियम, अध्यादेश, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना याद्वारे महाराष्ट्र राज्याचे, मुंबई क्षेत्र नसलेल्या, महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही प्रदेशाच्या संबंधात पारित केलेला किंवा प्रख्यापित केलेला कोणताही अधिनियम, विनियम किंवा अध्यादेश, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना यात सुधारणा करण्यात येत असेल त्याबाबतीत, अशा प्रकारे सुधारण्यात आलेल्या कायद्याचा अर्थ लावण्याच्या संबंधात, यापुढील तरतुदी लागू न होता, त्या प्रदेशात अंमलात असलेला कायदा, सुधारणा करणाऱ्या कायद्याला लागू होतील.]

निरसन. **२.** अनुसूचित निर्देशित केलेले मुंबई अधिनियम, त्याचा अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत निरसित कले आहेत.

**सर्वसाधारण व्याख्या.**

व्याख्या. **३.** विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरूद्ध काही नसल्यास, या अधिनियमात आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या सर्व मुंबई अधिनियमात [2][किंवा महाराष्ट्र अधिनियमांत],—

" अपप्रेरणा देणे. " (१) " अपप्रेरणा देणे " याला त्याचे व्याकरणिक रुपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसह, " भारतीय दंड संहिता " यात असलेला अर्थ राहील ; १८६० चा ४५.

" कृती. " (२) " कृती " हा शब्द अपराधांच्या किंवा दिवाणी अपकृतीच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा, त्यात कृतींच्या मालिकेचा समावेश होईल ; आणि जे शब्द केलेल्या कृतींचा निर्देश करतात त्यांच्या व्याप्तीत अवैध अकृतीदेखील येतात ;

शपथपत्र. (३) " प्रतिज्ञालेख " यात, शपथ घेण्याऐवजी दृढकथन आणि अधिकथन किवा अधिकथन करण्यास विधीने अनुज्ञात केलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, दृढकथन आणि अधिकथन यांचा समावेश होईल ;

" बॅरिस्टर " (४) " बॅरिस्टर " याचा अर्थ, इग्लंडचा किंवा आयर्लंडचा बॅरिस्टर असा किंवा स्कॉटलंडमधील " फॅकल्टो ऑफ ॲडव्होकेटस् " या संस्थेचा सदस्य असेल ;

---

[1] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(५) “ मुंबई अधिनियम ” याचा अर्थ, मुंबईच्या गव्हर्नर-इन-कौन्सिल यांनी [१][भारतीय कौन्सिल अधिनियम, १८६१,] किंवा भारतीय कौन्सिल अधिनियम १८६१ आणि १८९२ [२][किंवा सन १८६१ ते १९०९ चे भारतीय कौन्सिल अधिनियम, किंवा भारत शासन अधिनियम, १९१५ याअन्वये केलेला किंवा भारत शासन अधिनियमांन्वये स्थानिक [३][विधानमंडळाने किंवा [३][मुंबईच्या राज्यपालांनी] केलेला किंवा प्रादेशिक विधानमंडळाने किंवा [३][मुंबईच्या राज्यपालांनी ] भारत शासन अधिनियम, १९३५] अन्वये केलेला [४][किंवा [५][पुनर्रचनापूर्व किंवा पुनर्रचित] [३][मुंबई राज्याच्या] विधानमंडळाने, संविधानान्वये केलेला अधिनियम, ] असा असेल ; “ मुंबई अधिनियम ”

[६][(६) “ महाराष्ट्र राज्याचा मुंबई प्रदेश ” याचा अर्थ त्या राज्यातील विदर्भ प्रदेश आणि हैद्राबाद प्रदेश वगळून उर्वरित प्रदेश, असा असेल ] ;

[७][(७) * * * * * *]

[७][(८) * * * * * *]

(९) “ प्रकरण ” याचा अर्थ, अधिनियमाच्या ज्या प्रकरणात तो शब्द येईल असे प्रकरण, असा असेल ; “ प्रकरण ”

१९४५ चा मुंबई १७. [८][(१०) “ मुंबई शहर ” याचा अर्थ, बृहन्मुंबईबाबतचे कायदे आणि मुंबई उच्च न्यायालय (हद्द जाहीर करण्याबाबत) अधिनियम, १९४५, ज्या दिवशी अंमलात आला त्याच्या निकटपूर्वी, मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत असलेले क्षेत्र, असा असेल ; “ मुंबई शहर ”

(११) “ जिल्हाधिकारी ” याचा अर्थ, * मुंबई शहरात, मुंबई जिल्हाधिकारी असा, आणि इतरत्र जिल्ह्याच्या महसूल प्रशासनाचा मुख्य प्रभारी अधिकारी, असा असेल ; “ जिल्हाधिकारी ”

(१२) “ प्रारंभ ” ही संज्ञा, एखाद्या अधिनियमाच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा तिचा अर्थ, तो अधिनियम ज्या दिवशी अंमलात येईल तो दिवस, असा असेल ; “ प्रारंभ ”

१८७९ चा मुंबई ५. [९][(१३) “ आयुक्त ” याचा अर्थ, £ मुंबई जमीन महसूल संहिता. * १८७९ अन्वये नेमलेला एखाद्या विभागाचा आयुक्त असा असेल ;] “ आयुक्त ”

(१४) “ कॉन्सुलर अधिकारी ” यात कॉन्सल जनरल, कॉन्सल व्हाईस कॉन्सल, कॉन्सुलर एजंट, प्रोकॉन्सल आणि कॉन्सल जनरल, कॉन्सल किंवा कॉन्सुलर एजंट यांची कर्तव्ये बजावण्यासाठी त्या त्या वेळी प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, यांचा समावेश होईल ; “ कॉन्सुलर अधिकारी ”

---

[१] आता भारत शासन अधिनियम, १९३५ पहा.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये या मजकूरात फेरबदल करण्यात आलेला नाही.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९५६ द्वारे “ मुंबई राज्य ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे खंड (७) व (८) वगळण्यात आले.

[८] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ९, अनुसूची ‘ इ ’ आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ चे परंतुक याद्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड बदली दाखल करण्यात आली.

[९] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३, अनुसूची द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

* सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये “ बॉम्बे ” हे नाव पूर्ववत मुंबई असे करण्यात आले.

£ आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा.४१) पहा.

" जिल्हा न्यायाधीश " (१५) " जिल्हा न्यायधीश " याचा अर्थ, मूळ अधिकारितेच्या प्रमुख दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश, असा असेल, परंतु त्यात, आपल्या सर्वसाधारण किंवा असाधारण मूळ दिवाणी अधिकारितेचा वावर करणाऱ्या उच्च न्यायालयाचा समावेश होणार नाही ;

" दस्तऐवज " (१६) " दस्तऐवज " यात कोणताही मजकूर नमूद करण्याच्या प्रयोजनाकरिता वापरण्याचा उद्देश असेल किंवा वापरता येईल अशा कोणत्याही वस्तुवर अक्षरे, आकडे किंवा चिन्हे यांच्या सहाय्याने किंवा या साधनांपैकी एकाहून अधिक साधनांनी लिहिलेल्या, व्यक्त केलेल्या किंवा वर्णिलेल्या कोणत्याही मजकुराचा समावेश होईल ;

" अधिनियमिती " (१७) " अधिनियमिती " यात [१][* * * ] मुंबई संहितेच्या कोणत्याही विनियमाचा समावेश होईल, आणि तीत, कोणत्याही अधिनियमात किंवा उपनिर्दिष्ट कोणत्याही अशा विनियमात असलेल्या कोणत्याही तरतुदीचाही समावेश होईल ;

" वडील " (१८) " वडील " यात ज्या व्यक्तीस तिच्या व्यक्तिविषयक कायद्याअन्वये दत्तक घेण्याची मुभा आहे त्या व्यक्तीच्या बाबतीत, दत्तक घेण्याऱ्या वडीलांचा समावेश होईल ;

" वित्तिय वर्ष " (१९) " वित्तीय वर्ष " याचा अर्थ, एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवशी सुरू होणारे वर्ष, असा असेल ;

" सद्‌भावपूर्वक " (२०) जेव्हा एखादी गोष्ट वस्तुतः प्रामाणिकपणे केलेली असेल,—मग ती हयगयीने केलेली असो वा नसो— " ती सद्‌भावपूर्वक " केले असल्याचे मानले जाईल ;

" बृहन्मुंबई " [२][(२१) " बृहन्मुंबई " याचा अर्थ, बृहन्मुंबईबाबतचे कायदे आणि मुंबई उच्च न्यायालय (हद्द जाहीर करण्याबाबत) अधिनियम, १९४५ याच्या अनुसूची अ मध्ये निर्दिष्ट केलेली क्षेत्रे, असा असेल ] ; १९४५ चा मुंबई १७.

" उच्च न्यायालय " (२२) " उच्च न्यायालय " ही संज्ञा, दिवाणी कामकाजाच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा तिचा अर्थ, ती संज्ञा ज्या अधिनियमात आली असेल तो अधिनियम मुंबई इलाख्याच्या ज्या भागास [३][आणि १ मे १९६० नंतर महाराष्ट्र राज्यातील ज्या भागास] लागू असेल त्या भागातील अपिलाचे उच्चतम दिवाणी न्यायालय, असा असेल ;

[४][(२३) " [५][मुंबई राज्याचा ] हैद्राबाद प्रदेश " याचा अर्थ, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याचे कलम ८ पोट-कलम (१) चा खंड (ब) अन्वये नवीन मुंबई राज्याकडे हस्तांतरित केलेले प्रदेश [६][आणि १ मे, १९६० नंतर जे महाराष्ट्र राज्याचा भाग ठरतात व जे महाराष्ट्र राज्याचा हैद्राबाद भाग म्हणून ओळखले जातील असे उक्त प्रदेश ] असा असेल ] ; १९५६ चा ३७.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ कलम २ द्वारे मूळ मजकूर गाळण्यात आलेला अहे.

[२] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ कलम ९, अनुसूची ' ई ' आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ चे परंतुक याद्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ खंड (२३) वगळण्यात आले व मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) (दुसरी सुधारणा) आदेश, १९५७ द्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे नवीन खंड (२३) समाविष्ट करण्यात आला.

[५] या मजकुरात फेरबदल करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

[६] वरील आदेशाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२४) “ स्थावर मालमत्ता ” यात जमिनीचा जमिनीतून मिळणाऱ्या लाभांचा, आणि जमिनीशी संलग्न असलेल्या वस्तुंचा, किंवा जमिनीशी संलग्न असलेल्या कोणत्याही वस्तूशी कायमच्या जखडलेल्या वस्तूचा समावेश होईल ; “ स्थावर मालमत्ता ”

१८६० चा ४५. (२५) “ कारावास ” याचा अर्थ, [१][भारतीय दंड संहितेमधील ]व्याख्येत वर्णन केलेल्या दोन्ही प्रकारांचा कारावास, असा असेल ; “ कारावास ”

[२][ * * * * *]

(२६) “ स्थानिक प्राधिकरण ” याचा अर्थ, महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक मंडळ, बंदर विश्वतांचे किंवा आयुक्तांचे मंडळ, किंवा नगरपालिकेच्या किंवा स्थानिक निधीची व्यवस्था पाहण्याचा किंवा तीवर नियंत्रण ठेवण्याचा कायदेशीररित्या हक्क असलेले किंवा ज्याच्याकडे शासनाने ते काम सोपवले असेल असे इतर प्राधिकरण, असा असेल ; “ स्थानिक प्राधिकरण ”

[३][(२७) “ महाराष्ट्र अधिनियम ” याचा अर्थ, संविधानान्वये, महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाने १ मे, १९६० रोजी किंवा त्यानंतर केलेला अधिनियम, असा असेल ] ;

(२८) “ दंडाधिकारी ” यात, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या फौजदारी प्रक्रिया संहितेअन्वये दंडाधिकारी यांच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा समावेश होईल ; “ दंडाधिकारी ”

(२९) जहाजाच्या संदर्भात “ नौकाधिपति ” ही संज्ञा वापरली असता तिचा अर्थ त्या त्या वेळी जहाजाचे नियंत्रण किंवा त्याचा कार्यभार असणारी (पथदर्शी अधिकारी किंवा प्रमुख बंदर अधिकारी या व्यतिरिक्त) कोणतीही व्यक्ती, असा असेल ; “ नौकाधिपति ”

(३०) “ महिना ” याचा अर्थ, ब्रिटीश कॅलेंडरप्रमाणे गणना केली जाणारा महिना, असा असेल ; “ महिना ”

(३१) “ जंगल मालमत्ता ” याचा अर्थ, स्थावर मालमत्तेव्यतिरिक्त इतर प्रत्येक प्रकारची मालमत्ता असा असेल ; “ जंगम मालमत्ता ”

(३२) “ शपथ ” यात ज्या व्यक्तीस शपथ घेण्याऐवजी प्रतिज्ञा किंवा अधिकथन करण्याची कायद्याअन्वये परवानगी आहे, त्या व्यक्तीच्या बाबतीतील प्रतिज्ञेचा किंवा अधिकथनाचा समावेश होईल ; “ शपथ ”

(३३) “ अपराध ” याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये शिक्षापात्र केलेली कोणतीही कृती किंवा अकृती, असे असेल ; “ अपराध ”

(३४) “ भाग ” याचा अर्थ, ज्या अधिनियमात तो शब्द येईल त्या अधिनियमाचा भाग, असा असेल ; “ भाग ”

(३५) “ व्यक्ती ” यात कायद्याने संस्थापित असलेल्या किंवा नसलेल्या कोणत्याही कंपनीचा किंवा संघाचा किंवा व्यक्तींच्या निकायाचा समावेश होईल ; “ व्यक्ती ”

---

[१] केंद्रीय अधिनियम.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे खंड (२५अ) वगळण्यात आला.

[३] वरील आदेशाद्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[१][(३५-अ) पुनर्रचनेपूर्वीचे [२][ मुंबई राज्य ] याचा अर्थ ,

(अ) संविधानाच्या प्रारंभापूर्वीच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात, मुंबई इलाख्यात समाविष्ट असलेले क्षेत्र ;

(ब) संविधानाच्या प्रारंभानंतरच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६, हा अंमलात येण्यापूर्वी, संविधानाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले मुंबई राज्याचे प्रदेश, असा असेल ;] १९५६ चा ३७.

" सार्वजनिक उपद्रव " (३६) " सार्वजनिक उपद्रव " याचा अर्थ, भारतीय दंड संहितेत व्याख्या केल्याप्रमाणे असलेला सार्वजनिक उपद्रव, असा असेल ; १८६० चा ४५.

" नोंदणीकृत " [३][(३७) " नोंदणीकृत " ही संज्ञा दस्तऐवजाच्या संदर्भात वापरण्यात येईल तेव्हा तिचा अर्थ, भाग अ राज्य किंवा भाग क यात दस्तऐवजाची नोंदणी करण्याबाबत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये नोंदणी केलेला, असा असेल ;]

[४][(३८) * * * *]

" नियम " (३९) " नियम " याचा अर्थ, कोणत्याही अधिनियमिती अन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून तयार केलेले नियम, असा असेल, आणि तीत कोणत्याही अधिनियमिती अन्वये नियम म्हणून केलेल्या विनियमांचा समावेश होईल ;

[५](३९क) * * * *

" अनुसूची " (४०) " अनुसूची " याचा अर्थ, ज्या अधिनियमात तो शब्द असेल त्या अधिनियमाची अनुसूची, असा असेल ;

" अनुसूचित जिल्हा " (४१) " [६]अनुसूचित जिल्हा " याचा अर्थ, [७]अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला अनुसूचित जिल्हा, असा असेल ; १८७४ चा १२.

" कलम " (४२) " कलम " याचा अर्थ, ज्या अधिनियमात तो शब्द आला असेल त्या अधिनियमाचे कलम, असा असेल ;

---

[१] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] या मजकुरात फेरबदल करण्यात आलेला नाही, महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (३७) दाखल करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २ द्वारे खंड (३८) वगळण्यात आले.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे खंड (३९**क**), गाळण्यात आला.

[६] खालील मेहवासी प्रमुखांच्या मालकीची असलेली गावे :—

(१) काठी येथील पारवी.

(२) नाल येथील पारवी.

(३) सिंगपूर येथील पारवी.

(४) गावहल्ली येथील वाळवी.

(५) चिखली येथील वासवा

(६) नवलपूर येथील पारवी.

७. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये, अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ हा अंमलात असण्याचे बंद झाले आहे.

(४३) " जहाज " यात जे केवळ वल्ह्यांनीच चालविण्यात येत असेल असेच जलयान नव्हे तर, ज्याचा उपयोग नौकानयनासाठी करण्यात येत असेल अशा प्रत्येक जलयानाचा समावेश होईल ; " जहाज "

(४४) जी व्यक्ती आपले नाव लिहिण्यास असमर्थ आहे तिला अनुलक्षून " स्वाक्षरी करणे " हा शब्द वापरला असताना त्या शब्दांचे व्याकरणिक रुपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह त्यात निशाणी करणे या शब्दाचा, त्याचे व्याकरणिक रुपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसह समावेश असेल ; " स्वाक्षरी करणे. "

(४५) " पुत्र " यात, ज्या व्यक्तीस त्याच्या व्यक्तीविषयक कायद्यान्वये दत्तक घेण्याची मुभा आहे त्या व्यक्तीच्या बाबतीत, दत्तक पुत्राचा समावेश होईल ;

(४६) " पोट-कलम " याचा अर्थ, ज्या कलमात तो शब्द येईल त्या कलमाचे पोट-कलम, असा असेल ; " पोट-कलम "

[१][(४६अ) [२][ मुंबई राज्य ] याचा अर्थ,–

(अ) दिनांक १ नोव्हेंबर, १९५६ पूर्वीच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात, पुनर्रचनापूर्व मुंबई राज्य, असा असेल ;

१९५६ चा ३७. (ब) त्या दिवसाच्या किंवा त्यानंतरच्या कोणत्याही कालावधीच्या संबंधात, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ याच्या कलम ८ अन्वये नवी मुंबई राज्यात समाविष्ट करण्यात आलेला प्रदेश, असा असेल ;

[३][(४६अअ) " महाराष्ट्र राज्य " याचा अर्थ, मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९६० च्या कलम ३ अन्वये १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्य म्हणून ओळखला जाणारा प्रदेश, असा असेल ; १९६० चा ११.

[१][(४६ब) " हस्तांतरित केलेले प्रदेश " याचा अर्थ, राज्य पुनर्रचना अधिनियम, १९५६ यांची कलमे ७ व १० या अन्वये पुनर्रचनापूर्व [२][ मुंबई राज्यातून ] म्हैसूर आणि राज्यस्थान या नवीन राज्याकडे हस्तांतरित केलेले प्रदेश, असा असेल ; १९५६ चा ३७.

(४७) " शपथपूर्वक सांगणे " याचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार व सजातीय शब्दप्रयोग धरून तीत, ज्या व्यक्तीस शपथपूर्वक सांगण्याऐवजी प्रतिज्ञा किंवा अधिकथन करण्याची कायद्यान्वये परवानगी आहे त्या व्यक्तीच्या बाबतीत प्रतिज्ञा किंवा अधिकथन करणे यांचा समावेश होईल ; " शपथपूर्वक सांगणे "

(४८) " जलयान " यात कोणतेही जहाज किंवा नौका किंवा नौकानयनाच्या कामी वापरलेले कोणत्याही प्रकारचे जलयान, यांचा समावेश होईल ; " जलयान "

१९५६ चा ३७. [४][(४८-क) " [२][मुंबई राज्याचा] विदर्भ विभाग किंवा मध्य प्रदेश क्षेत्र किंवा विदर्भ प्रदेश " याचा अर्थ, पुनर्रचना अधिनियम, १९५६, कलम ८, पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये नवीन मुंबई राज्याकडे हस्तांतरित केलेले प्रदेश [५][आणि १ मे १९६० नंतर ] जे महाराष्ट्र राज्याचा भाग ठरतात आणि महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेश किंवा मध्यप्रदेश किंवा विदर्भ प्रदेश म्हणून जे ओळखले जातील ते उक्त प्रदेश, असा असेल,]

---

[१] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] या मजकुरात फेरबदल करण्यात आलेला नाही, महाराष्ट्र विधि अनकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

[३] वरील आदेशाद्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) (दुसरी सुधारणा) आदेश, १९५७ द्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

" इच्छापत्र "

(४९) " इच्छापत्र " यात कोडपत्राचा (कोडिसिल) आणि मालमत्तेची मरणोत्तर व्यवस्था करण्यासाठी स्वखुशीने केलेल्या प्रत्येक लेखाचा समावेश होईल;

" लेखन "

(५०) " लेखन " याचा निर्देश करणाऱ्या शब्दप्रयोगाचा अन्वयार्थ त्यात मुद्रण, शिलामुद्रण, छायाचित्रण यांचे किंवा कोणत्याही पदार्थावर शब्दांनी किंवा आकृती दृश्यरुपात आविष्कृत करणाऱ्या किंवा पुनरनिर्मिती करण्याऱ्या अन्य पद्धतीचे निर्देश समाविष्ट आहेत असे समजण्यात येईल ; आणि

" वर्ष "

(५१) " वर्ष " याचा अर्थ, इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे मोजलेले वर्ष, असा असेल.

" मागील व्याख्यांपैकी विविक्षित व्याख्या, पूर्वीच्या मुंबई अधिनियमांना लागू करणे. "

**४.** कलम ३ मधील पुढील शब्दांच्या व्याख्या, म्हणजे "अपप्रेरणा" देणे, "प्रतिज्ञालेख", [१]* * * [२][महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेश], " प्रकरण ", " मुंबई शहर ", " जिल्हाधिकारी ", " आयुक्त ", " सद्‌भावपूर्वक", [३][बृहन्मुंबई] १ * * * [४][मुंबई राज्याचा] [५][हैद्राबाद प्रदेश] [६][* * *] " स्थावर मालामत्ता ", " कारावास ", " दंडाधिकारी", " महिना ", " जंगम मालमत्ता ", " शपथ ", " भाग ", " व्यक्ती", [७][पुनर्रचनापूर्व] [४][मुंबई राज्य] [१][* * *] [१][* * *] " अनुसूची ", " कलम " [२][मुंबई राज्य] [२][महाराष्ट्र राज्य] " शपथपूर्वक सांगणे ", [७][दुसऱ्या राज्यात हस्तांतरित केलेले प्रदेश].

" जलयान " [५][[४][मुंबई राज्याचा] " विदर्भ विभाग", मध्यप्रदेश क्षेत्र, किंवा विदर्भ प्रदेश] " लेखन " आणि वर्ष हे शब्द विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरुद्ध असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाच्या पूर्वी केलेल्या मुंबईच्या सर्व अधिनियमांना लागू असतील.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे " ब्रिटिंग इंडिया "हा मजकूर वगळण्यात आला.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ आणि सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२ याच्या कलम २ च्या परंतुकाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] या मजकुरात फेरबदल करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० पहा.

[५] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) (दुसरी सुधारणा) आदेश, १९५७ द्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे, मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे " मुंबई राज्याचा कच्छ प्रदेश " आणि " मुंबई राज्याचा सौराष्ट्र प्रदेश" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ द्वारे हा मजकूर समविष्ट करण्यात आला.

## अन्वयार्थाबाबत सर्वसाधारण नियम

**५.** [१](१) कोणताही मुंबई अधिनियम [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम] कोणत्या विशिष्ट दिवशी अंमलात येणार आहे. याबाबत त्यात व्यक्त केले नसेल तेव्हा,—— मुंबई अधिनियम [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम] अंमलात येणे.

(एक) संविधानच्या प्रांरभापूर्वी केलेल्या मुंबई अधिनियमाच्या बाबतीत तो विधानमंडळाचा अधिनियम असेल तर, यथास्थिति, राज्यपाल, गव्हर्नर जनरल किंवा हिज मजेस्टी यांची त्यास मिळालेली अनुमती ज्या दिवशी प्रथम **राजपत्रात** प्रसिध्द केलेली असेल त्या दिवशी आणि तो राज्यपालाचा अधिनियम म्हणून राजपत्रात प्रसिध्द केला असेल त्या दिवशी अंमलात येईल ;

(दोन) संविधानच्या प्रांरभानंतर केलेल्या मुंबई अधिनियमाच्या [२][किंवा महाराष्ट्र अधिनियमाच्या ] बाबतीत. तो यथास्थिति, राज्यपाल किंवा राष्ट्रपती यांची आवश्यक अनुमती त्यास मिळल्याचे ज्या दिवशी प्रथम **राजपत्रात** प्रसिध्द केलेले असेल त्या दिवशी अंमलात येईल. ]

(२) मुंबई अधिनियम [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम ] हा, एतद्विरुध्द स्पष्ट नमुद केलेले नसेल तर, त्याच्या प्रारंभानंतर लगतपूर्वीचा दिवस संपल्यानंतर लगेच अंमलात येईल, असा याचा अर्थ लावला जाईल.

**६.** या अधिनियमात आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या प्रत्येक मुंबई अधिनियमात [२][किंवा महाराष्ट्र अधिनियमात ] कलम ५, पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेला त्याच्या अशा प्रस्द्धिीचा दिनांक त्या अधिनियमाच्या नावाच्या वर छापण्यात येईल आणि तो त्या अधिनियमाचा भाग असेल. प्रकरणानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे राज्यपाल, राष्ट्रपती किंवा हिज मॅजेस्टी यांची अनुमती मिळाल्यानंतर ज्या दिनांकास प्रसिध्द करण्यात येईल तो दिनांक छापणे.

**७.** आतापर्यंत केलेली किंवा यानंतर करण्यात येणारी कोणतीही अधिनियमिती. या अधिनियमान्वये किंवा कोणताही मुंबई अधिनियम [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम ] याअन्वये, निरसित करण्यात येईल त्याबाबतीत, इतर उद्देश दिसून न आल्यास, तो निरसित केल्यामुळे,—— निरसनाचा परिणाम.

(अ) असे निरसन अंमलात येईल तेव्हा, त्या त्या वेळी अंमलात नसलेली किंवा अस्तित्वात नसलेली कोणतीही गोष्ट,पुन्हा चालू होणार नाही; किंवा

(ब) असे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या आधीच्या अंमलास किंवा त्याअन्वये रीतसर केलेल्या कृत्यास किंवा सोसलेल्या कोणत्याही गोष्टीस बाध येणार नाही; किंवा

(क) अशा निरसत केलेल्या कोणत्याही अधिनियमितीअन्वये संपादन केलेल्या, प्राप्त झालेल्या कोणत्याही हक्कास, विशेषाधिकारास, किंवा उद्‌भवलेल्या कोणत्याही आबंधनास किंवा दायित्वास बाध येणार नाही ; किंवा

---

[१] विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ड) अशा निरसत केलेल्या कोणत्याही अधिनियमितीविरूद्ध केलेल्या कोणत्याही अपराधामुळे झालेल्या कोणत्याही शास्तीस. सरकारजमा करण्यास किंवा शिक्षेस बाध येणार नाही ; किंवा

(ई) उपरिनिर्दिष्ट कोणत्याही अशा हक्काच्या, विशेषाधिकाराच्या, आबंधनाच्या, दायित्वाच्या, शास्तीच्या, सरकारजमा करण्याच्या किंवा शिक्षेच्या बाबतीतील कोणत्याही तपासणीस, कायदेशीर कार्यवाहीस किंवा उपाययोजनेस बाध येणार नाही, आणि जणू काही निरसित करणारा अधिनियम पारित झाला नव्हता अशा रीतीने अशी कोणतीही तपासणी. कायदेशीर कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल अशी कोणतीही शास्ती, साकारजमा किंवा शिक्षा करता येईल.

कोणत्याही अधिनियमाच्या मूळ मजकुरात सुधारणा करण्याऱ्या अधिनियमितीचे निरसन.

[१][**७अ.** पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमितीतील मूळ मजकुरातील कोणताही मजकूर स्पष्टपणे वगळून किंवा त्यात कोणत्याही मजकूर जादा किंवा बदलीदाखल करुन, तो, ज्या अधिनियमितीअन्वये सुधारण्यात आला असेल अशी कोणतीही अधिनियमिती, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम] निरसित करण्यात येईल तेव्हा, निराळा उद्देश दिसून न आल्यास, अशा निरसित केलेल्या अधिनियमितीअन्वये केलेली. आणि अशा निरसित करण्याच्या वेळी अंमलात असलेली अशी कोणतीही सुधारणा पुढे चालू राहण्यास अशा निरसनामुळे बाध येणार नाही.]

निरसित केलेल्या अधिनियमितीचे पुनरूज्जीवन.

**८.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमात [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम] संपूर्णतः किंवा अंशतः निरसित केलेली कोणतीही अधिनियमिती संपूर्णतः किंवा अंशतः पुनरूज्जीवित करण्याच्या प्रयोजनासाठी ते प्रयोजन स्पष्टपणे नमूद करणे हे आवश्यक असेल.

(२) हे कलम, या अधिनियमाच्या प्रांरभापूर्वी केलेल्या सर्व मुंबई अधिनियमांना देखील लागू आहे.

निरसित अधिनियमितींच्या निर्देशांचा अन्वयार्थ.

**९.** या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [२][किंवा महाराष्ट्र अधिनियम] मागील अधिनियमितीची कोणत्याही तरतूद निरसित करण्यात येईल किंवा ह्यातील फेरबदलासह किंवा फेरबदला शिवाय पुन्हा अंमलात आणण्यात येईल तेव्हा, अशा निरसित केलेल्या तरतुदीसंबंधीचे कोणत्याही इतर अधिनियमातील किंवा कोणत्याही संलेखातील निर्देश हे, निराळा उद्देश दिसून न आल्यास, अशा पुन्हा अंमलात आणलेल्या तरतुदी संबंधीचे निर्देश आहेत, असा त्याचा अन्वयार्थ लावला जाईल.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**१०.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमात [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात ] दिवसांच्या मालिकेतून किंवा कोणत्याही इतर मुदतीच्या कालावधीतून पहिला दिवस वगळण्याच्या प्रयोजनाकरिता "पासून" हा शब्द वापरणे, आणि दिवसांच्या मालिकेत किंवा कोणत्याही इतर मुदतीच्या कालावधीत शेवटचा दिवस समाविष्ट प्रयोजनाकरिता "पर्यंत" हा शब्द वापरणे हे, पुरेसे असेल. मुदतीचा प्रारंभ व शेवट.

(२) हे कलम, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या सर्व मुंबई अधिनियमांना देखील लागू आहे.

**११.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] कोणतीही कृती किंवा कार्यवाही कोणत्याही न्यायालयात किंवा कार्यालयात एखाद्या विवक्षित दिवशी किंवा विहित मुदतीत करावयाचा किंवा स्वीकारावयाचा निदेश दिला असल्यास किंवा तशी मुभा दिली असल्यास, जर त्या दिवशी किंवा विहित केलेल्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी न्यायालय किंवा कार्यालय बंद असेल तर, त्या दिवसानंतर येणाऱ्या ज्या पुढील दिवशी न्यायालय किंवा कार्यालय उघडे असेल त्या दिवशी केलेली किंवा स्वीकारलेली कृती किंवा कार्यवाही योग्य मुदतीत केलेली किंवा स्वीकारलेली कृती किंवा कार्यवाही आहे, असे समजण्यात येईल : मुदतीची संगणना.

परंतु, [२] भारतीय मुदत अधिनियम, १८७७ हा लागू असलेल्या कोणत्याही कृतीस किंवा कार्यवाही या कलमातील कोणतीही गोष्ट लागू नसेल.

**१२.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमाच्या] प्रयोजनार्थ कोणतेही अंतर मोजताना, ते अंतर, निराळा उद्देश दिसून न आल्यास, आडव्या सरळ रेषेत मोजण्यात येईल. अंतराची मोजणी.

**१३.** विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरूद्ध काही नसल्यास, सर्व मुंबई अधिनियमातील [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमातील],— लिंग आणि वचन.

(अ) पुल्लिंगी शब्दात स्त्रीलिंगी शब्दांचा समावेश होतो, असे समजण्यात येईल; आणि

(ब) एकवचनी शब्दात बहुवचनी शब्दांचा व या उलट बहुवचनी शब्दांत एकवचनी शब्दांचा समावेश होईल.

**अधिकार आणि कार्याधिकारी**

**१४.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] [३][कोणत्याही शासनास] कोणतेही अधिकर देण्यात आल्यास, प्रंसगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, वेळोवेळी त्या अधिकारांचा वापर करता येईल. कोणत्याही शासनास दिलेल्या अधिकारांचा वेळीवेळी वापर करणे.

---

[१] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] आता भारतीय मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९) केंद्रीय अधिनियम पहा.

[३] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "शासनास" या मजकुराऐवजी "कोणत्याही शासनास" हा मजकूर दाखल करण्यात आला.

नेमणूक करण्याच्या अधिकारामध्ये पदसिद्ध नेमणूक करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे.

**१५.** कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये,[१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये]कोणतेही पद भरण्यासाठी किंवा कार्य पार पाडण्यासाठी कोणत्याही व्यक्तीस नेमण्याचा अधिकारी दिला असेल तेव्हा, अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल तर, कोणतीही अशी नेमणूक जर ती अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेली असेल तर, ती नावाने किंवा पदपरत्वे करण्याचा अधिकार असेल.

नेमणूक करण्याच्या अधिकारामध्ये निलंबित करण्याच्या किंवा बडतर्फ करण्याच्या अधिकाराचा समावेश असणे.

**१६.** कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये]कोणतीही नेमणूक करण्याचा अधिकार दिला असेल तेव्हा, वेगळा उद्देश दिसून न आल्यास, नेमणूक करण्याचा अधिकार असलेल्या प्राधिकाऱ्यास अशा अधिकाराचा वापर करून, त्याने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस निलंबित करण्याचा किंवा बडतर्फ करण्याचा देखील त्यास अधिकार असेल.

कार्याधिकाऱ्या ऐवजी दुसरा कार्याधिकारी नेमणे.

**१७.** (१) अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमात [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात] पदासंबंधीचे कार्य त्या त्या वेळी पार पाडीत असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना कायदा लागू आहे हे दर्शविण्याच्या प्रयोजनार्थ, सध्या कामे पाडीत असणाऱ्या अधिकाऱ्याच्या किंवा जो सामान्यतः कामे पार पाडतो त्या अधिकाऱ्याचे पदनाम निर्देशित करणे, हे पुरेसे असेल.

(२) हे कलम या अधिनियमाच्या मारंभार्वी केलेल्या सर्व मुंबई अधिनियमांना देखील लागू आहे.

उत्तराधिकारी.

**१८.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमात [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात] अखंड परंपरा असणाऱ्या, कोणत्याही कार्याधिकाऱ्यांच्या किंवा महामंडळाच्या उत्तराधिकाऱ्यांचा कायद्याशी असलेला संबंध दर्शविण्याच्या प्रयोजनाकरिता, त्याचा कार्याधिकाऱ्याशी किंवा महामंडळाशी असलेला संबंध स्पष्ट करणे, हे पुरेसे असेल.

(२) हे कलम, या अधिनिमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या सर्व मुंबई अधिनियमांना देखील लागू आहे.

कार्यालयीन मुख्याधिकारी आणि दुय्यम कर्मचारी.

**१९.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमात, [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात]कार्यालयीन मुख्याधिकाऱ्यास किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यास लागू असलेला कायदा, त्या पदाची कर्तव्ये कायदेशीररीत्या बजावीत असलेल्या त्या पदाच्या उपाधिकाऱ्यांना किंवा दुय्यम कर्मचाऱ्यांना लागू असेल हे दर्शविण्यास प्रयोजनार्थ, वरिष्ठांचे कर्तव्य निर्दिष्ट करणे, हे पुरेसे असेल.

(२) हे कलम, या अधिनिमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या सर्व मुंबई अधिनियमांना देखील लागू आहे.

## अधिनियमितींअन्वये केलेले आदेश, नियम इत्यादी संबंधीच्या तरतुदी

मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] काढलेले आदेश, वगैरे यांचे अन्वयार्थ.

**२०.** (१) कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] कोणतीही अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना काढण्याचा अधिकार दिला असेल तेव्हा, ती अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना या अधिनियमाच्या प्रारंभानंतर करण्यात आल्यास त्यात वापरलेल्या संज्ञाना, विषयात किंवा संदर्भात एतद्‌विरूद्ध काही नसल्यास, तो अधिकार देणाऱ्या अधिनियमात त्या संज्ञांना अनुक्रमे जे अर्थ असतील तेच अर्थ असतील.

---

[१] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**२१.** (१) कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] अधिसूचना काढण्याचा, आदेश देण्याचा. नियम किवा उपविधी करण्याचा अधिकार दिला असेल तेव्हा, त्या अधिकारामध्ये अशा काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेत, दिलेल्या कोणत्याही आदेशात, केलेल्या कोणत्याही नियमात किंवा कोणत्याही उपविधीत जादा मजकूर दाखल करण्याच्या, त्यात सुधारणा करण्याच्या, फेरफार करण्याच्या किंवा ते विखंडित करण्याच्या अधिकाराचा समावेश होत असून, असा अधिकार त्याच रीतीने, वापरण्याजोगा असेल आणि तो तशाच मंजुरीस आणि शर्तींना (कोणत्याही असल्यास) अधीन असेल.

आदेश, इत्यादी काढण्याच्या अधिकारामध्ये जादा मजकूर दाखल करण्याच्या, सुधारणा करण्याच्या, फेरफार करण्याच्या किंवा विखंडित करण्याच्या अधिकारांचा समावेश असणे.

**२२.** [२][पारित झाल्यानंतर] अंमलात येणार नसेल अशा कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] तो अधिनियम लागू करण्याच्या बाबतीत किंवा कोणत्याही न्यायालयाची किंवा कार्यालयाची स्थापना करण्याच्या बाबतीत किंवा त्या अन्वये कोणत्याही न्यायाधीशाची किंवा अधिकाऱ्याची नेमणुक करण्याच्या बाबतीत किंवा त्या अधिनियमान्वये कोणत्याही व्यक्तीने कोणतीही गोष्ट, कोणत्या वेळी, कोणत्या जागी किंवा कोणत्या रीतीने किंवा किती फी घेऊन करावयाची त्या बाबतीत, नियम किंवा उपविधी करण्याचा किंवा आदेश देण्याचा अधिकार प्रदान केला असेल तेव्हा, त्या अधिकाराचा [२][तो अधिनियम पारित झाल्यानंतर] कोणत्याही वेळी वापर करता येईल. परंतु, असे केलेले नियम किंवा उपविधी किंवा असे दिलेले आदेश, त्या अधिनियमाचा प्रारंभ होईपर्यंत परिणामक होणार नाहीत.

मुंबई अधिनियमाच्या [१][किंवा महाराष्ट अधिनियमाच्या प्रसिद्धीच्या आणि प्रारंभीच्या दरम्यान नियम, किंवा उपविधी करणे किंवा आदेश देणे.

**२३.** कोणत्याही मुंबई अधिनियमात [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात] किंवा कोणत्याही अशा अधिनियमान्वये पारित केलेल्या कोणत्याही नियमात असा निदेश देण्यात आला असेल की, कोणताही आदेश, अधिसूचना किंवा इतर बाब अधिसूचित केले जाईल किंवा प्रसिद्ध केली जाईल तेव्हा, त्या अधिनियमितीमध्ये किंवा नियमामध्ये अन्यथा तरतूद केलेली नसल्यास, असे अधिसूचित करणे किंवा प्रसिद्ध करणे जर [३][**राजपत्रात**] प्रसिद्ध केले असेल तर, ते यथोचितरीत्या केल्याचे समजण्यात येईल.

आदेश, आणि अधिसूचनेची **राजपत्रातील** प्रसिद्धी ही, त्याची यथेचित प्रसिद्धी असण्याचे समजणे.

**२४.** कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] नियम किंवा उपविधी करण्याचा अधिकार, ते नियम किंवा उपविधी पूर्वप्रसिद्धीनंतर करावेत अशा शर्तीस अधीन राहून देण्यात यावा असे नमूद केले असेल तेव्हा, पुढील तरतुदी लागू असतील :—

पूर्व प्रसिद्धी देऊन नियम किंवा उपविधी, करण्याच्या बाबतीत लागू असलेल्या तरतुदी.

(अ) ते नियम किंवा उपविधी करण्याचा अधिकार असलेला प्राधिकारी, ते करण्यापूर्वी, प्रस्तावित नियमांचा किंवा उपविधींचा मसुदा, ज्या व्यक्तींवर त्यामुळे परिणाम होण्याचा संभव असेल त्या व्यक्तींच्या माहितीकरिता प्रसिद्ध करील ;

---

[१] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे अनुक्रमे, "गव्हर्नर जनरलची संमती मिळाल्यानंतर, तो मुंबई शासन राजपत्रात ज्या दिवशी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला असेल त्या दिवशी आणि "वरील प्रमाणे अधिनियम प्रसिद्ध झाल्यानंतर" या मजकुराऐवजी अनुक्रमे "पारित झाल्यानंतर" व "तो अधिनियम पारित झाल्यानंतर", हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील आदेशाद्वारे "मुंबई शासन राजपत्रात" या मजकूराऐवजी "शासकीय राजपत्रात" हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) तो प्राधिकारी, पुरेशा वाटेल अशा रीतीने असा मसुदा प्रसिद्ध करील किंवा पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीनुसार आवश्यक असेल तर [१][केंद्र सरकार किंवा, यथास्थिति,] [२][राज्य ] शासन] विहित करील अशा रीतीने प्रसिद्ध करील ;

(क) त्या मसुद्यासोबत तो मसुदा कोणत्या दिनांकास किंवा कोणत्या दिनांकानंतर विचारात घेतला जाईल ते विनिर्दिष्ट करणारी नोटीस प्रसिद्ध करण्यात येईल ;

(ड) ते नियम किंवा उपविधी करण्याचा अधिकार असलेला प्राधिकारी, आणि असे नियम किंवा उपविधी ज्या दुसऱ्या प्राधिकरणाच्या मंजुरीने, मान्यतेने किंवा सहमतीने करावयाचे असतील तो प्राधिकारी देखील, अशा विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी कोणत्याही व्यक्तीकडून त्या मसुद्याबाबत जी कोणताही आक्षेप किंवा सूचना, प्राप्त होतील त्यावर असा नियम किंवा उपविधी करण्याचा अधिकार असलेला प्राधिकारी विचार करील ;

(ई) जो नियम किंवा उपविधी, पूर्वप्रसिद्धी देऊन करण्याच्या अधिकाराचा वापर करून तयार करण्यात आला असल्याचे दिसून येईल तो नियम किंवा उपविधी [३][शासकीय राजपत्रात ] प्रसिद्ध करणे हे, तो नियम किंवा उपविधी योग्यरित्या तयार केला असल्याचा निर्णयक पुरावा असेल ;

निरसित करून पुन्हा अधिनियमित केलेल्या अधिनियमिती अन्वये दिलेले आदेश, इत्यादी चालू राहणे.

**२५.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, मुंबई अधिनिमान्वये [४][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] कोणतीही अधिनियमिती निरसित करण्यात आली असेल किंवा, फेरबदलांसह किंवा त्याशिवाय पुन्हा अधिनियमित करण्यात आली असेल तर, अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली नसल्यास, निरसित केलेल्या अधिनियमिती अन्वये केलेली कोणतीही नेमणूक, अधिसूचना, आदेश, योजना, नियम, उपविधी किंवा नमुना, पुन्हा अधिनियमित केलेल्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर ते, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि अशा पुन्हा अधिनियमित केलेल्या तरतुदींअन्वये केलेल्या कोणत्याही नेमणुकीअन्वये, अधिसूचनेअन्वये, आदेशाअन्वये, योजनेअन्वये, नियमान्वये, उपविधीअन्वये किंवा नमुन्याअन्वये त्यांचे अधिक्रमण झाल्याखेरीज व होईपर्यंत ते, अशाप्रकारे पुन्हा अधिनियमित केलेल्या तरतुदींअन्वये केलेले आहे किंवा दिलेले आहे. असे समजण्यात येईल.

## संकीर्ण

दंड वसुली.

**२६.** दंड वसूल करण्यासाठी अधिपत्रे काढणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे याबाबत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या [५][भारतीय दंड संहितेची ] कलमे ६३ ते ७०, आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी या, कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [४][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये ]किंवा कोणत्याही मुंबई अधिनियमाखाली [४][किंवा महाराष्ट्र अधिनियमाखाली ] केलेले कोणतेही नियम यांअन्वये किंवा उपविधीं या अन्वये केलेल्या सर्व प्रकारांच्या दंडास त्या अधिनियमात, नियमात किंवा उपविधीत, त्याविरूद्ध स्पष्ट तरतूद नसेल तर, लागू असतील.

[१] वरील आदेशाद्वारे "स्थानिक शासन", या मजकूराऐवजी "केंद्र सरकार किंवा यथास्थिति, प्रांतिक शासन", हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक", या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "मुंबई शासन राजपत्रात", या मजकुराऐवजी "शासकीय राजपत्रात", हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्याच आला.

[५] केंद्रीय अधिनियम.

**२७.** जेथे एखादी कृती किंवा अकृती दोन किंवा अधिक अधिनियमितीअन्वये, अपराध ठरत असेल तेथे, अपराधी, त्या दोन्ही किंवा अधिक अधिनियमितींपैकी कोणत्याही अधिनियमिती अन्वये त्याच्यावर खटला भरला जाण्यास आणि त्यास शिक्षा होण्यास पात्र असेल, परंतु, तो एकाच अपराधाकरिता दोनदा शिक्षा होण्यास पात्र नसेल. दोन किंवा अधिक अनियमिती खाली शिक्षापात्र असलेल्या अपराधांबाबतच्या तरतुदी.

**२८.** जेथे कोणत्याही दस्तऐवज डाकने बजावणे—मग " बजावणे " हा शब्दप्रयोग केलेला असो वा " देणे " किंवा " पाठविणे " वा दोहोंपैकी कोणताही शब्दप्रयोग असो किंवा कोणत्याही शब्दप्रयोगचा वापर केलेला असो– हे या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केल्या जाणाऱ्या कोणत्याही मुंबई अधिनियमान्वये [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमान्वये] प्राधीकृत किंवा आवश्यक करण्यात येईल तेथे-वेगळा उद्देश दिसून न आल्यास, दस्तऐवज अंतर्भूत असलेले पत्र, योग्य पत्ता घालून व आगाऊ हंशील भरून नोंदणीकृत डाकेने ते डाकेत टाकले की ती बजावणी झाली, आणि विरुद्ध शाबीत झाले नाही तर, डाकेच्या सामान्य व्यवहारक्रमानुसार त्या पत्राचा बटवडा ज्यावेळी होऊ शकतो त्यावेळेस ती बजावणी झाली असे मानण्यात येईल. डाकेने बजावणे याचा अर्थ.

**२९.** (१) कोणत्याही मुंबई अधिनियमात [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात]आणि कोणत्याही मुंबई अधिनियमाखाली [१][किंवा कोणत्याही मुंबई अधिनियमाखाली ]किंवा त्याला अनुलक्षून केलेल्या कोणत्याही नियमात, उपविधीत, लेखात किंवा दस्तऐवजात कोणताही अधिनियमितीचा उल्लेख करावयाचा असेल तर अशा प्रसंगी तिला दिलेल्या नावाचा किंवा संक्षिप्त नाव (कोणतेही असल्यास) त्या संक्षिप्त नावाचा उल्लेख करून किंवा त्याच्या क्रमांकाचा आणि वर्षाचा उल्लेख करून अशाप्रकारे त्या अधिनियमितीचा उल्लेख करता येईल. आणि त्या अधिनियमितीतील कोणत्याही तरतुदीचा उल्लेख करावयाचा असेल तर, अशा प्रसंगी, त्या अधिनियमितीच्या ज्या कलमात किंवा पोट-कलमात ती तरतूद असेल त्या कलमाचा किंवा पोट-कलमचा उल्लेख करून त्या तरतुदींचा उल्लेख करता येईल. अधिनियमितीचा उल्लेख करणे.

(२) वा अधिनियमात आणि या अधिनियमाच्या प्रारंभानंतर केलेल्या कोणत्याही मुंबई अधिनियमात [१][किंवा महाराष्ट्र अधिनियमात]अन्य अधिनियमितीच्या एखाद्या भागाचे वर्णन किंवा उल्लेख असेल त्यात, वेगळा उद्देश दिसून न आल्यास, त्या वर्णन केलेल्या किंवा उल्लेख केलेल्या भागाचा सुरवातीचा म्हणून आणि शेवटचा म्हणून जो शब्द, कलम किंवा इतर भाग यांचा निर्देश किंवा उल्लेख केला असेल त्या शब्दाचा, कलमाचा किंवा भागाचा समावेश होतो, असा त्याचा अर्थ लावण्यात येईल.

**३०.** या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेला कोणताही अधिनियम, नियम किंवा उपविधी या अधिनियमाच्या प्रारंभानंतर कोणत्याही अधिनियमांन्वये, नियमांन्वये किंवा उपविधींअन्वये चालू ठेवण्यात येईल किंवा सुधारण्यात येईल तेव्हा ; असा चालू राहण्याच्या किंवा अशी सुधारणा केल्याच्या कारणांमुळेच केवळ अशा अधिनियमांचा, नियमांचा किंवा उपविधींचा अर्थ लावण्यावर या अधिनियमाची पूर्ववर्ती कलमे परिणाम करणार नाहीत. पूर्वीचे अधिनियम, नियम आणि यांची व्यावृत्ती.

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अध्यादेश आणि विनियम यांना, हा अधिनियम लागू असणे.

[१][**३१.** या अधिनियमाच्या तरतूदी—

(अ) भारत सरकार अधिनियम, १९३५ याच्या कलम ८८ अन्वये [२][मुंबईच्या राज्यपालांनी ]प्रख्यापित केलेल्या कोणत्या अध्यादेशाच्या संबंधात, उक्त अधिनियमान्वये राज्यपालांनी केलेल्या मुंबई अधिनियमाच्या बाबतीत त्या जशा लागू होतील आणि उक्त अधिनियमाच्या कलम ९२ अन्वये राज्यपालानी केलेल्या कोणत्याही विनियमाच्या संबंधात, त्या प्रांतिक विधानमंडळाने केलेल्या मुंबई अधिनियमांचा बाबतीत जशा लागू होतील ; आणि

(ब) संविधानाच्या अनुच्छेद २१३ अन्वये राज्यपालांनी प्रख्यापित केलेल्या कोणत्याही अध्यादेशाच्या किंवा संविधानाची पाचवी अनुसूची याच्या परिच्छेद ५ अन्वये राज्यपालांनी केलेल्या कोणत्याही विनियमाच्या संबंधात, त्या राज्य विधानमंडळाने केलेल्या मुंबई अधिनियमांच्या [३][किंवा महाराष्ट्र अधिनियमांच्या ]बाबतीत जशा लागू असतील तशा लागू होतील ;

परंतु या अधिनियमाचे कलम ५, पोट-कलम (एक) याचा खंड (दोन) हा, खंड (ब) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही आध्यादेशास, जणू काही कोणत्याही अधिनियमांची मंजुरी राजपत्रात प्रथम प्रसिद्ध केल्याच्या दिवसाचा उल्लेख याच्या ऐवजी तो अध्यादेश त्या राजपत्रात प्रथम प्रसिद्ध केल्याच्या दिवसाचा उल्लेख दाखल केल्याप्रमाणे, लागू असेल.]

[१] विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे कलम ३१ दाखल करण्यात आले.

[२] या मजकुरांत फेरबदल करण्यात आलेल नाही. महारष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० पहा.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे हा मजकूर समानिष्ट करण्यात आला.

# अनुसूची

निरसित अधिनियमिती

(कलम २ पहा)

| वर्ष | क्रमांक | संज्ञा किंवा विषय | निरसित झाल्याची मर्यादा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १८८६ | दोन | मुबंई सर्वासाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६. | [१][अनुसूची ख चा] [२][जितका भाग निरसित न केलेल्या अधिनियमांच्या बाबतीत लागू असेल तो खेरीजकरून] सर्व. |
| १८९१ | एक | मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ सुधारण्याबाबत अधिनियम. | निरसित केलेला नसेल तितका भाग. |
| १८९६ | एक | वरील प्रमाणे. | संपूर्ण |

## परिशिष्ट

मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८८६ ची [३]अनुसूची ख

(सन १८८६ चा मुंबई अधिनियम ३).

मुंबई गव्हर्नर इन कौन्सिल याच्या विनियमांत आणि अधिनियमांत केलेल्या शब्दांच्या सुधारणा.

| अधिनियम | | | निरसित केलेले शब्द | रद्द केलेल्या शब्दांच्याऐवजी दाखल केलेले शब्द, कोणतेही असल्यास. |
|---|---|---|---|---|
| क्रमांक आणि वर्ष | कलम | खंड | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| विनियम— | | | | |
| [४]१८२७ चा १२ | १९ | १ | “फौजदारी न्यायाधीश” | “जिल्हा फौजदारी न्यायाधीश” |
| | १९ | ६ | “फौजदारी न्यायाधीशाने” (पहिल्या वेळी हे शब्द येतात तेव्हा). | “जिल्हा फौजदारी न्यायाधीशाने” |

१ मुंबई निरसन व सुधारणा अधिनियम, १९०५ (सन १९०५ चा मुंबई ४) च्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ या अधिनियमाचे परिशिष्ट म्हणून मुद्रित केला आहे.

३ सन १९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ याच्या अनुसूचीमध्ये १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ द्वारे विवक्षित शब्द दाखल करण्याच्या वेळी अशा अधिनियमाच्या संबंधात ती पुनरुद्धत करणे आवश्यक असल्यामुळे निरसित न केलेल्या अधिनियमांवर तिचा परिणाम होत असेल तेथेवर, येथे परिशिष्ट म्हणून उद्धृत करण्यात आली आहे. तसेच १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ परिसंमत झाल्यानंतर जी कलमे निरसित केली आहेत किंवा त्याऐवजी नवीन करण्यात आली आहेत त्या संबंधीच्या नोंदी वगळण्यात आल्या आहेत. प्रत्येक बाबतीत तळटीप देण्यात आली आहे.

४ सन १८२७ चा मुंबई विनियम क्रमांक १२ याचे कलम १९, खंड क ६, ७ व ८ हे मुंबई जिल्हा पोलीस अधिनियम, १८९० (सन १८९० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४) द्वारे तो अधिनियम जेथे लागू होती तेथे, निरसित करण्यात आले आहेत हा विनियम, सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३ द्वारे निरसित करण्यात आला.

**परिशिष्ट**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| विनियम-<br>१८२७ चा<br>१२- चालू | १९ | ६ | " फौजदारी न्यायाधिशाने " (दुसऱ्या वेळी तो शब्द येतो तेव्हा). | " कोणत्याही फौजदारी न्यायाधिशाने " |
| | १९ | ६ | "सामान्य" | " नुसत्या" |
| | १९ | ६ | " मजुरीवाचून " | |
| | १९ | ७ | " फौजदारी न्यायाधिशा-विरुद्ध " (पहिल्या वेळी तो शब्द येतो तेव्हा). | "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाविरुद्ध." |
| | १९ | ७ | "फौजदारी न्यायाधिशाने" (दुसऱ्या वेळी तो शब्द येतो तेव्हा. | "ज्या फौजदारी न्यायाधिशापुढे अशा व्यक्तीविरुद्ध कामकाज चालू असेल त्या फौजदारी न्यायाधिशाने. " |
| | १९ | ८ | " फौजदारी न्यायाधिशाने कब्जातही घेतली पाहिजे." | "कोणत्याही फौजदारी न्यायाधिशास कब्जात घेण्याचा अधिकार आहे. " |
| | २० | . . | "फौजदारी न्यायाधिशाने " | "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने. " |
| | २७ | २ | "फौजदारी न्यायाधिशास" (प्रत्येक वेळी तो शब्द येईल तेव्हा). | "जिल्हा फौजदारी न्यायाधिशास". |
| | २७ | २ | " सामान्य " | " नुसत्या " |
| | २७ | २ | " सक्त मजुरीवाचून " | " नुसत्या " |
| | ३७ | १ | "फौजदारी न्यायाधिशास" | "जिल्ह्याच्या किंवा पोट-विभागाच्या फौजदारी न्यायाधिशास". |
| सन १८२७ चा २२ | ४० | . . . | "फौजदारी न्यायाधिशास" | "जिल्हा फौजदारी" न्यायाधिशास". |
| | ४१ | १ | "स्थानिक" | "जिल्हा" |
| | ४२ | १ | "स्थानिक" | "जिल्हा" |
| | ४२ | २, ३, ४ | "फौजदारी न्यायाधीश" (ज्या प्रत्येक वेळी तो शब्द येईल तेव्हा). | "जिल्हा फौजदारी" "न्यायाधीश" |
| सन १८२७ चा २५ | ४ | २ | "फौजदारी न्यायाधीश" (तो शब्द येतो त्या दोन्ही वेळी). | "जिल्हा फौजदारी न्यायाधीश" |
| | ७ | .. | "फौजदारी न्यायाधीश" | " जिल्हा फौजदारी न्यायाधीश". |
| अधिनियम— | | | | |
| सन १८६२ चा १ | १ | . . . | "या अधिनियमास जोडलेले" | . . . |
| सन १८६२ चा ४ | १ | . . . | " फौजदारी न्यायाधीश " (तो शब्द दुसऱ्या वेळी येतो तेव्हा.) | "प्रथम वर्ग फौजदारी न्यायाधीश." |
| | १ | . . . | " कॅलेंडर" | . . . |

**परिशिष्ट**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | ६ | . . . | "फौजदारी न्यायाधिशाने" | "जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने ". |
| | ६ | . . . | "या अधिनियमाअन्वये" | "कलम ४ अन्वये" |
| | ६ | . . . | " पोलीस " | . . . |
| | ७ | . . . | "दोन्हीपैकी कोणत्याही एक प्रकारचे " | . . . . . . |
| | ७ | . . . | " कॅलेंडर " | . . . |
| | १० | . . . | " फौजदारी न्यायाधिशाने" | " जिल्हा फौजदारी न्यायाधिशाने." |
| | १० | . . . | " पोलीस" | . . . |
| सन १८६२ चा ५. | ३ | . . . | " कॅलेंडर" | |
| सन १८६२ चा ६ | ८ व ९ | | " कॅलेंडर " (हा शब्द येईल त्या प्रत्येक वेळी). | . . . |
| | २१ | . . . | " पुढील शब्द आणि संज्ञा" | . . . |
| | २१ | . . . | " यांना याअन्वये देण्यात येईल तो अर्थ असेल " | . . . . . . |
| | २१ | . . . | " (म्हणजे) " | . . . |
| अधिनियम– | | | | |
| सन १८६३ चा १ | ६ | . . . | " जस्टीस ऑफ दीप पीस किंवा सिंध प्रांतात फौजदारी न्यायाधिशाचे अधिकार वापरणारी व्यक्ती. " | " पहिल्या वर्गाचा " |
| | १२ | . . . | " वरील प्रमाणे " | " वरीलप्रमाणे " |
| | ११ | . . . | " या अधिनियमाच्या " | . . . |
| सन १८६३ चा २ | २ | . . . | " या अधिनियमाचे " (हा शब्द प्रथम येईल त्या वेळी) | . . . |
| | ३, ४, ५, ७, ८, १०, ११ आणि १३ | . . . . . . | " या अधिनियमाचे " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | . . . |
| | ४, ५ आणि ११. | . . . | " कॅलेंडर (हा शब्द " येईल त्या प्रत्येक वेळी.) | . . . |
| | ५ आणि ११ | | " कलेक्टराचे कार्यालय किंवा " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | . . . |
| | ११ | ४ | " कलेक्टराचे कार्यालय " | " जिल्हा " |
| | ११ | ६ | " कलेक्टराचे कार्यालय " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी) | " जिल्हा " |

[1] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ कलम ३, दुसरी अनुसूची द्वारे सन १८६२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ निरसित करण्यात आला.

**परिशिष्ट—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| सन १८६३ चा ३ | १ आणि २, | . . . | “ या अधिनियमास ” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | . . . |
| सन १८६३ चा ५ | २० | . . . | “या अधिनियमाचे” | . . . |
| [1]* | * | * | * * * | * |
| सन १८६३ चा ७ | ६ | . . . | “ या अधिनियमाच्या ” हे शब्द प्रथम येतील त्या वेळी). | . . . |
| | ७,८,९, ११,१२ १३ आणि २६, | .... | “ या अधिनियमाचे ” “या अधिनियमातील ” व “या अधिनियमातील” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | . . . |
| | ९ | १ आणि २ | “कलेक्टराचे कार्यालय किंवा” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | . . . |
| | ३, ४, ६ आणि ७. | | “कलेक्टराचे कार्यालय” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | “ जिल्हा ” |
| | ९ | ८ | “कॅलेंडर” | . . . |
| | ९ | ९ | “महसूल” | . . . |
| | ९ | ९ | “विभागाचे” | |
| | १२ | ... | “ किंवा सब-कलेक्टर” | . . . |
| | २० | २ | “ या अधिनियमास ” | . . . |
| सन १८६६ चा ७ | ६ | ... | “या अधिनियमाचे ” | . . . |
| सन १८६६ चा १२ | १५ | ... | “या अधिनियमास जोडलेल्या” | . . . |
| [2]* | * | * | * | * * |
| सन १८६७ चा ६, | ५,९ आणि १० | .... | “या अधिनियमाचे” (हे शब्द येतील त्या प्रत्येकवेळी). | .... |
| [3]सन १८६६ चा ७ | ३४ | .... | “या अधिनियमाचे” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | .... |

[1] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ द्वारे सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ हा निरसित करण्यात आल्यामुळे त्यासंबंधीची नोंद वगळण्यात आली.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे सन १८६६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ अंमलात असण्याचे बंद झाल्याने त्या अधिनियमासंबंधीची नोंद वगळण्यात आली.

[3] ज्या कोणत्याही वेळी सन १९९३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ आणि नियम व उपविधी हे कोणत्याही गावात अंमलात असतील त्यावेळी सन १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ ची कलमे ३३ व ३४ ही उक्त गावात अंमलात असल्याचे बंद होईल. सन १९९३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ चे कलम ११५ पहा.

**परिशिष्ट—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | ३४ | .... | "संपूर्ण अधिकार असलेल्या फौजदारी न्यायाधिशांचे" | "प्रथमवर्ग दंडाधिकाऱ्याने" |
| अधिनियम— | | | | |
| सन १८६७ चा ८ | [1][१ | ... | "पोलीस कमिशनर" अधिनियम,१८६१. | "सन १८६७ आणि १८९० चे अधिनियम".] |
| | ३,४,५, १५ व १८ | ... | "पोलीस (हा शब्द उक्त कलमात "कमिशनराच्या" या शब्दाच्या पूर्वी जेथे जेथे येईल तेथे तेथे )." | .... |
| | ५ | | "पोलीस" (हा शब्द "कमिशनर" या शब्दाच्या पूर्वी जेथे जेथे येईल तेथे तेथे). | .... |
| | १८ | ... | " या अधिनियमाचे " | .... |
| सन १८६८ चा २ | १७ | ... | " महसूल किंवा पोलीस " | .... |
| [2]* | * | * | * | * * |
| सन १८७४ चा १ | प्रस्तावनेत | ... | " या अधिनियमास " | ... |
| | | ४ | शेवटचे तीन शब्द | ... |
| | | १३ | " या अधिनियमाची " (हे शब्द येतील त्या वेळी). | ... |
| | | १४ | " या अधिनियमाची " | .... |
| | | २९ | " कॅलेंडर " | .... |
| सन १८७४ चा ३ | | १५ | " या अधिनियमाचे " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | ... |
| [3]सन १८७४ चा ३ | ३, ४, ६, ७, १०, ११, १२, १३, २१, ३१, ३७, ३९, ५५, ६७, ७३ ७५, ७६, व ८३. | | " या अधिनियमाचे " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | ... |

[1] मुंबई सर्वसाधारण परिभाषा सुधारणा अधिनियम, १८९१ (सन १८९१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ द्वारे सन १८६९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ निरसित करण्यात आल्यामुळे त्या अधिनियमाच्या संबंधातील नोंद वगळण्यात आली.

[3] सन १९९० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ द्वारे या अधिनियमाची कलमे ४४, ४७, ५० व ५९ या संबंधीच्या नोंदी निरसित करण्यात किंवा समाविष्ट करण्यात आल्यामुळे त्या वगळण्यात आल्या आहेत.

**परिशिष्ट—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| अधिनियम- | | | | |
| सन १८७४ चा ३ | ६ | १ | "महसूल " (हा शब्द येईल त्या प्रत्येक वेळी). | .... |
| | २० | ... | " या अधिनियमाचे " (हे शब्द प्रथम येतील त्या वेळी). | .... |
| | ४० | १ | शेवटचे तीन शब्द | ... |
| | ७३ | २ | " या अधिनियमाचे " | ... |
| | ७४ | ... | "महसूल " | |
| | ७४ | ... | "सन १८३० चा विनियम ५ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर विधीअन्वये नेमलेले ". | |
| | ७७ | ... | " सन १८६८ चा मुंबई अधिनियम १ यांच्या उपबंधान्वये अधिकार दिलेले ". | |
| | ७७ | ... | " असे अधिकार दिलेले " | |
| | ८४ | ... | "महसूल " | |
| सन १८७५चा ३ | ७ | ... | " दोन्हीपैकी कोणत्याही एका प्रकारचे " | ... |
| | ७ | ... | "कॅलेंडर " | |
| सन १८७६चा २ | १४, १६ १८ व ३३. | .... | या अधिनियमाचे " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | ... |
| | १६ | ... | "यात यापुढे जोडलेल्या " | ... |
| | ३१ | ... | "या अधिनियमास जोडलेल्या " | |
| [1]* | * | * | * | * * |
| सन १८७७ चा १ | ३, ९, १६, १७ आणि २५ | ... | "या अधिनियमाचे " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | ... |

[1] सन १९०६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ द्वारे सन १८७६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ हा निरसित करण्यात आल्यामुळे त्यासंबंधीची नोंद वगळण्यात आली.

**परिशिष्ट—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| अधिनियम— | | | | |
| सन १८७७चा १ | | | | |
| | ९, १०, ११, १४,१५, १७ आणि १८ | .... | "या अधिनियमास जोडलेले " (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी.) | ... |
| | १२ | (ब) | " या अधिनियमाचे " | |
| | १९ | ... | " या अधिनियमाचे " (हे शब्द प्रथम येतील त्या वेळी). | ... |
| | २३ | (ब) | " या अधिनियमाचे " | |
| | २० आणि २४ | ... | " भारतीय दंड संहितेच्या अर्थाप्रमाणेच्या कोणत्याही एका प्रकारची " ( हे शब्द जेथे जेथे येतील त्या प्रत्येक ठिकाणी). | |
| | २८ | ... | " भारतीय दंड संहिता, कलमे ६४ते ७० (दोन्ही धरून) यांचे उपबंध लागू असतील. " | |
| | २८ | ... | "आणि असे सर्व दंड " | |
| [१]सन १८७८ चा ५ | ३ | ३ | "म्हणजे, सिंध प्रांतात, [२][प्रांतिक सरकार] आणि इतरत्र जमीन महसुलाचा कमिशनर, किंवा या अधिनियमाच्या कारणां-करिता, सरकार कोणताही इतर अधिकारी कमिशनर म्हणून नेमील तर, असा इतर अधिकारी." | "या शब्दांत या अधिनियमाच्या कारणांकरिता कमिशनर म्हणून सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो." |
| | ३ | ४ | " म्हणजे जमीन महसुलाचा कमिशनर किंवा " | "या शब्दांत, यांचा समावेश होतो " |

[१] सन १९१२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ द्वारे या अधिनियमाचे कलम ५० यासंबंधीची नोंद, त्या कलमाऐवजी दुसरे कलम दाखल करण्यात आल्यामुळे वगळण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "सिंधमधील आयुक्त" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(शा.म.मु) एच ४०९५-४ (२,५००-११-२०१५)

**परिशिष्ट—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | ४५ | ... | “या अधिनियमाचे ” (हा शब्द येईल त्या प्रत्येक वेळी). | ... |
| अधिनियम- | | | | |
| सन १८७९ चा ४ | ३, ९ | ... | “शेवटची तीन शब्द ” | .... |
| | १०, ११ १४, १५, १७ आणि १८ | ... | “ या अधिनियमास जोडलेले ” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | ... |
| | ९, १६, १७, आणि २५ | ... | “ या अधिनियमाचे ” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी). | ... |
| | १२ | (ब) | “ या अधिनियमाचे ” | ... |
| | १९ | ... ... | “या अधिनियमाचे ” (हे शब्द प्रथम येतील त्या वेळी). | ... |
| | २० आणि २४ | ... | “ भारतीय दंड संहितेच्या अर्थाप्रमाणेच्या कोणत्याही एका प्रकारची ” (हे शब्द जेथे जेथे येतील तेथे तेथे). | |
| | २३ | (ब) | “ या अधिनियमाच्या ” | ... |
| सन १८७९ चा ५ | ३ | २ | “ या अधिनियमाच्या ” | ... |
| | १०, १३, १८, ३८, ८६, ८७, १६१ व २१६ | | “ या अधिनियमाच्या ” (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी ). | ... ... |
| | २३ | ... | “ या अधिनियमाच्या ” | ... |
| [१]सन १८७९ चा ६ | २१ व ३४ | ... | “ या अधिनियमाच्या ” | ... |
| [१]सन १८७९ चा ७ | ३ | ५ | “ या संज्ञेचा अर्थ, जिल्ह्याचा मुख्य महसूल अधिकारी, असा समजावा, आणि ” | ... |

[१] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ द्वारे या अधिनियमाची कलमे २, २१४ व २१५ ही निरसित करण्यात आल्यामुळे किंवा त्याऐवजी दुसरी कलमे दाखल करण्यात आल्यामुळे त्यासंबंधीच्या नोंदी वगळण्यात आल्यात.

**परिशिष्ट**—समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | ५७ | ... | “ या अधिनियमाच्या ” | ... |
| | ६१ व ६२ | ... | “ भारतीय दंड संहितेच्या अर्थाप्रमाणेच्या कोणत्याही एका प्रकारची ” (हे शब्द जेथे जेथे येतील तेथे तेथे). | ... |
| | ६७ | ... | “ विभागणीच्या ” | ... |
| [1]सन १८८०चा १ | ३ | ७ | “ या अधिनियमास जोडलेल्या ” | ... |
| | ३३ | (ब) | “ या अधिनियमास जोडलेल्या ” | |
| [1]सन १८८३ चा १ | ३, ५, व ८ | .... | “ या अधिनियमास जोडलेल्या ” या अधिनियमाच्या (हे शब्द येतील त्या प्रत्येक वेळी ). | ... |
| | ३ | ... | “ या अधिनियमाच्या ” | |
| [1]सन १८८३ चा २ | .... | प्रस्तावनेत | “ या अधिनियमाच्या ” | ... |
| | ४ | ... | “ या अधिनियमाच्या ” | |
| | १७ | ... | “ या अधिनियमाच्या ” (हे शब्द प्रथम येतील त्या वेळी) | ... |

[2]* * * * * * *

[1] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ द्वारे याअधिनियमाची कलमे २, २०१४ व २०१५ ही निरसित करण्यात आल्यामुळे किंवा त्याऐवजी दुसरी कलमे दाखल करण्यात आल्यामुळे त्यासंबंधीच्या नोंदी वगळण्यात आल्यात.

[2] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ द्वारे सन १८८४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ निरसित करण्यात आल्यामुळे त्या अधिनियमाच्या त्स्संबधी नोंद वगळण्यात आली आहे.

**शब्दसूची**

| | |
|---|---|
| declare | अधिकथन करणे |
| act or omission | कृती किंवा अकृती |
| Transferred territories | हस्तांतरित केलेले प्रदेश |
| will | इच्छापत्र |
| codicil | कोडपत्र |
| writing | लेखन |
| His majesty | हिज मॅजेस्टी |
| unless the contrary is | एतद्विरुद्ध स्पष्ट नमूद केलेले नसेल तर |
| expressed acquired | उद्भवलेली |
| forfeiture | सरकारजमा |
| remedy | उपाययोजना [कलम ७ (ङ)]. |
| revival | पुनरुज्जीवन [कलम ८]. |
| references | निर्देश [कलम ९ समास टिप]. |
| construed-construction | अन्वयार्थ लावणे |
| -enacted | पुन्हा अधिनियमित करणे |
| period of time | मुदतीचा कालावधी [कलम १० (१)]. |
| series of days | दिवसांची मालिका [कलम १० (१)]. |
| computation of time | मुदतीची संगणना [कलम ११]. |
| vice-versa | उलट [कलम १३]. |
| functionaries | कार्याधिकारी [कलम १४]. |
| unless it is otherwise expressly provided | अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल तर [कलम १५]. |
| by virtue of office | पदपरत्वे [कलम १५]. |
| unless a different intention appears expressly provided | वेगळा उद्देश दिसून न आल्यास [कलम १६]. |

**शब्दसूची—**समाप्त

| | |
|---|---|
| commonly execut | सामान्यतः पार पाडणे [कलम १७]. |
| deputy | उपाधिकारी [कलम १९]. |
| subordinate | दुय्यम कर्मचारी [कलम १९]. |
| unless there is anything repugnant in the subject or context | विषयात किंवा संदर्भात एत्‌दविरूद्ध काही नसल्यास [कलम २०]. |
| shall not taken effect | परिणामक होणार नाहीत [कलम २२]. |
| previous publication | पूर्वप्रसिद्धी [कलम २४]. |
| manner | रीत [कलम २४(ख)]. |
| purporting to have been made | करण्यात आल्याचे अभिप्रेत असणे [कलम २४(ङ)]. |
| with reference to | त्याला अनुलक्षून [कलम २९(१)]. |
| different intention | वेगळा उद्देश [कलम २९(२)]. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.